**CNR NO. MHST05-000005-2018**

**वि.दि.मु.क्र. ०९/२०१८**

शाबीरा दिलावर नायकवडी ..... **वादी**

**वि.**

श्रीमती शहिदा रहिमतुल्ला मुजावर वगैरे .... **प्रतिवादी**

**नि. ५८ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी नि.५५ वर झालेला उलटतपास नाहीचा आदेश रद्द होणेकामी दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जास वादीने अर्जाखाली म्हणणे देवून तीव्र विरोध केला आहे.

३. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीच्या वकिलांचे निवेदन असे की, कामकाज मागील तारखेस उलटतपास घेणेकामी नेमण्यात आले होते. परंतु प्रतिवादीचे वकील पुकारा केला त्यावेळी गैरहजर असल्यामुळे नि.५५ वर दि.२४/०१/२०१९ रोजी सदर प्रतिवादीविरुध्द उलटतपास नाही असा हुकूम झाला असल्याचे दिसून आले. प्रस्तुतच्या उलटतपास नाहीच्या आदेशामुळे प्रतिवादी यांचे नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द करण्यात यावा. वादीच्या वकीलांचे निवेदन असे की, प्रतिवादीने केवळ मोघम स्वरुपाची कथने करुन सदरचा अर्ज दाखल केला आहे, त्यासोबत ॲफिडेव्हीट दिलेले नाही, कामकाज लांबविणेसाठी मुद्दामहून दिलेल्या तारखेदिवशी उलटतपास घेतला नाही. त्यामुळे वरील सर्व कारणांचा विचार होऊन अर्ज नामंजूर करावा. प्रतिवादी यांना २,५००/- रुपये कॉस्ट करण्यात यावी.

४. वादी व प्रतिवादी यांनी अर्ज म्हणणे व युक्तिवादातील केलेली कथने विचारात घेता तसेच प्रस्तुतचा दावा हा खरेदीपत्र करुन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी असल्याने त्यासंबंधीचा पुरावा न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे.

प्रतिवादींना उलटतपास घेणेची संधी दिल्यास अर्जाचा गुणदोषावर निर्णय होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. परंतु अर्ज मंजूर करताना प्रतिवादीवर खर्च बसविणे न्यायोचित होईल . म्हणून मी खालील आदेश देत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.१ यांचेविरुद्ध झालेला उलटतपास नाहीचा आदेश रक्कम रु.२००/- खर्चादाखल वादीना देण्याच्या अटीवर रद्द केला आहे.

(न्यायासनावर अधिघोषीत केले)

Prasad Anant Savadikar
Digitally signed by Prasad Anant Savadikar
Date: 2019.08.28 12:33:56 +0530

कराड. **(प्र. अ. सवदीकर)**
दि. २७/०८/२०१९ सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड